# लॉकडाउन – एक वरदान

by M W Khan*

विश्वाच्या निर्मात्या ईश्वराने माणसाला जन्म दिला आणि त्याला पृथ्वीवर वसवले. त्याला प्रत्येक संधी पुरवली, आणि मग त्याला संपूर्ण स्वातंत्र्य दिले. तथापि हे स्वतः माणसावर अवलंबून आहे की त्याने आपल्या स्वातंत्र्याचा योग्य वापर करावा आणि स्वतःला चिरकालीन यशास पात्र बनवावे. आणि जर तो आपल्या स्वातंत्र्याचा गैरवापर करणार असेल तर ईश्वराच्या निर्मिती योजनेनुसार चिरकालीन अपयशाशिवाय त्याचे दुसरे काही भवितव्य नाही.

आधुनिक औद्योगिक क्रांतीनंतर ईश्वराने माणसाकरिता कृपेची सर्व दारे खुली केली. आधी माणूस केवळ जीवनावश्यक गोष्टी वापरून जीवन जगायचा. पण आजच्या युगातील वैज्ञानिक संस्कृतीने माणसाला ऐषारामाची असंख्य साधने उपलब्ध करून दिली. या सर्व कृपा ईश्वरी देणग्या होत्या. पण माणसाने त्यांना देणग्या म्हणून पाहिले नाही तर त्यांना प्राप्त करणे हेच आपले ध्येय बनवले. “Work hard, party harder.” हे ते ध्येय होते. याचा अर्थ आहे स्वतःला समर्पित करून पैसे कमावणे, आणि त्यापेक्षा अधिक समर्पणाने ऐषारामाचे जीवन जगणे.

ऐषारामाच्या गोष्टींचा हा विस्फोट खरे पाहता एक अनुग्रह आहे. या सर्व गोष्टी लाइफ सपोर्ट सिस्टम अंतर्गत अस्तित्वात आल्या आहेत. त्यातील कोणत्याही वस्तूचे निर्माण माणूस स्वतःहून करू शकत नाही. ही संपूर्ण प्रणाली निर्मात्याने माणसावर केलेली कृपा आहे. ही कृपा स्वतः या गोष्टीचा पुरावा आहे की माणसाने गंभीर होऊन विचार करावा की त्याने या कृपेची काय परतफेड केली. पण माणूस या वास्तवाला विसरून ज्या मार्गावर चालू लागला तो असा होता की –

> कोणी या प्रकारचं पुस्तक लिहिलं – Man Stands Alone. म्हणजे माणूस या जगात सर्वशक्तिमान आहे, तो वाटेल ते करू शकतो, तो कोणाला उत्तरदायी नाही, कोणी त्याचा ईश्वर नाही.
>
> कोणी आपल्या ऐषारामाच्या जीवनशैलीसाठी हे तत्त्व बनवले – ‘right here, right now’ (येथेच, आत्ताच). म्हणजे तुम्हाला जी इच्छा पूर्ण करायची आहे ती याच जगात पूर्ण करून घ्या. पण माणसाची ही कृती निर्मात्याप्रति कृतज्ञतेच्या भावनेविरुद्ध होती.

कदाचित याच वास्तवाचं स्मरण करून द्यायला करोना विषाणूचे प्रकरण घडले. करोनाच्या लाटेने या क्षणी संपूर्ण जगाला घेरले आहे. पूर्ण जगाची प्रशासने या आजाराच्या प्रसाराला नियंत्रित करण्यासाठी लॉकडाउनचा मार्ग अवलंबत आहेत. ज्यामुळे समाजात राहताना लोक एकमेकांपासून अंतर राखतील, आणि या आजाराचे परिणाम आटोक्यात येतील. लॉकडाउन काय आहे? हा एक आणीबाणीचा उपाय आहे. यामध्ये धोका पाहता लोकांना एक मर्यादित क्षेत्र किंवा इमारत सोडण्यास तात्पुरती मनाई केली जाते. पण ज्या आवश्यक सेवा आहेत त्या सुरू ठेवल्या जातात. म्हणजे ऐषारामाच्या जीवनापासून दूर राहत एकांतवासासारखे साधे जीवन जगणे.

वास्तविक स्वरूपात लॉकडाउन चिंतन व मनन करण्यासाठी एक सक्तीची स्थिती आहे. जेणेकरून माणसाने आत्मपरीक्षण करावे, आपल्या निर्मितीचा उद्देश ओळखण्याचा प्रयत्न करावा, ऐषारामाची जीवनशैली अंगीकारण्यापेक्षा ‘साधी राहणी, उच्च विचारसरणी’चा मार्ग अवलंबावा.

त्याने हा विचार करावा की त्याचे निरोगी शरीर संपूर्णपणे ईश्वराची देण आहे. अन्न, पाणी, ऑक्सिजन वगैरे त्याने निर्माण केलेले नाहीत. तर विश्वाच्या निर्मात्याने त्याला या गोष्टी दिल्या आहेत. त्याला या वास्तवाची जाणीव व्हावी की तो या जगामध्ये सर्वशक्तिमान नाही, तर सर्वशक्तिमान त्याचा निर्माता आहे, माणूस सर्वशक्तिहीन आहे. आधुनिक वैज्ञानिक आविष्कार त्याला बक्षीस म्हणून मिळालेले नाहीत तर ते परीक्षा म्हणून आहेत. ते याकरिता आहेत की त्याद्वारे माणसाला ईश्वराचा परिचय उच्च स्तरावर व्हावा. त्याने स्वतःमध्ये ईश्वरी व्यक्तिमत्त्वाची उभारणी करावी. आणि अंतिम क्षण येण्याआधी स्वतःमध्ये त्या व्यक्तिमत्त्वाची निर्मिती करावी जे त्याला चिरकालीन स्वर्गासाठी पात्र बनवेल.

---

* प्रस्तुत लेखाचे लेखक मौलाना वहीदुद्दीन खान दिल्लीस्थित एक आध्यात्मिक विद्वान आहेत. अनेक देशांनी अनेक शांती पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले आहे. डेमीअर्गस आंतर्राष्ट्रीय शांती पुरस्कार, राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार, राजीव गांधी राष्ट्रीय सद्भावना पुरस्कार, दिल्ली गौरव पुरस्कार, पद्मभूषण, शांतिदूत त्यांपैकी काही आहेत. https://cpsglobal.org/books/mwk/english वर लेखकाची बरीच पुस्तके उपलब्ध आहेत.

(२८ मार्च २०२० च्या दैनिक राष्ट्रीय सहारा मधील लेखाचा हा मराठी अनुवाद आहे.)